ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 7 | MARCH - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडक गावातील देवतांच्या यात्रांचा ऐतिहासिक अभ्यास



प्रा. प्रकाश संभाजी जमदाडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग, दहिवडी कॉलेज दहिवडी
प्रा. डॉ. संजय सदाशिव गायकवाड
संशोधन मार्गदर्शकइतिहास विभागप्रमुख, एम.एच. महाडीक आर्टस्, कॉमर्स कॉलेज मोडनिंब, ता. माढा जि. सोलापूर (महाराष्ट्र)

## प्रस्तावना

उत्तर सोलापूर तालुक्यामधील प्रत्येक गावामध्ये विविध देवदेवतांची मंदिरे आहेत.तालुक्यामध्ये गावच्या ग्रामदैवतांच्या यात्रा व उत्सव दरवर्षी आयोजित केल्याजातात.यात्रावउत्सवामधून मानवाच्या सामाजिक विकासाला व कलात्मक प्रवृत्तीला अविष्काराची संधी मिळते. यात्रा म्हणजे ग्रामीण जीवनातील लोकांना दिला जाणारा शहरी अनुभव होय.गावच्या यात्रेमुळे दोन चार दिवस गावातील लोकांना नागरी जीवनाचा अनुभव घेता येतो. यात्रेमुळे ग्रामीण शहरी या दोन्ही जीवनाचे व संस्कृतीचे मिश्रण व आदान प्रदानहोत राहते.समाजातील लोकांचे त्या गावातील देवतेविषयीचेमहात्मेव तिच्यावरील श्रद्धा यात्राव उत्सव यामधून दिसून येते. याबरोबरच व्यापार व आर्थिक उलाढालीसाठी देखीलगावची यात्रा महत्वाची असते.जत्रा व यात्रेच्या वेळी गावोगावीकुस्त्याच्या स्पर्धा भरविल्या जातात.त्यामुळे कुस्तीगीरांना व पैलवानांनाएक व्यासपीठ मिळते. यात्रेच्या काळामध्ये गावामधील प्रत्येक घरोघरी पाहुण्यांची मोठ्याप्रमाणात गर्दी होते त्यातून विचारांची देवाण घेवाण होऊन नातेसंबंध दृढ होतात. यात्रेच्या काळात कृषी प्रदर्शने, जनावरांचे बाजार भरविले जातात. त्यामुळे ग्रामीण जीवनामध्येयात्रांना खूप महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसून येते. उत्तर सोलापूर तालुक्यामध्ये गावोगावी वेगवेगळया देवतांच्या यात्रा भरतात. यामधील काही निवडकगावातीलयात्रांचा अभ्यासया शोधनिबंधामध्ये करण्यात आला आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडक गावातील धार्मिक स्थळांचा अभ्यास करणे.
२. उत्तर सोलापूर तालुक्यातील निवडक गावातील धार्मिक स्थळांच्या यात्रांचा अभ्यास करणे.
३. उत्तर सोलापूर तालुक्याच्यासांस्कृतिक विकासामध्येधार्मिक स्थळांच्या यात्रांचे योगदान अभ्यासणे.

## संशोधन पद्धती

सदर संशोधन विषयाचा अभ्यास करण्यासाठी ऐतिहासिक वसर्वेक्षण संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## मार्डीची यमाईदेवी

देवस्थानाची पूर्वपीठिका अशी आहे की, गुलबर्गाजिल्ह्यातील शेडम चितापूरजवळील काळगीया गावी इ.स. १२०० मध्येरंगनाथ स्वामी गोसावी (मोकाशी) हे निःस्सीम देवीभक्तराहातहोते.महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माहूर येथील रेणुकादेवी मंदिराच्या परिसरात नारायण टेकडी येथे त्यांनी एक तप तपश्चर्या केली.या तपश्चर्येमुळे रेणुका देवी प्रसन्न झाली आणि सध्याच्या मार्डी त्यावेळच्यामारकंडेयनगरीमध्ये बनओहोळ (दाजी पाटील यांच्या शेतात) येथे काळीकपिला गाय घेऊन जाण्याची आज्ञा केली. ती गाय जिथे पान्हावेल त्या ठिकाणीमी दर्शन देईन, असा वर देवीने दिला. देवीच्या आज्ञेप्रमाणे रंगनाथ स्वामी हेमार्कंडेयनगरात (मारोडी) येऊन काळी कपिला गाय घेऊन गावाच्याउत्तरेला बनओहोळ ठिकाणी गेले. तेथे गाय पान्हावली आणि तिथे जमीन दुभंगून देवीने साक्षात दर्शन दिले. तेव्हा सहजच रंगनाथ स्वामी यांच्या तोंडूनमहाक्षेत्र मारुडी आदिस्थान महाकालची शक्ती नांदे निदान तुझ्या दर्शनीमुकी होय सर्व लोका। यमाई यमाई असे नित्य घोका।हे उदगार पडले.त्या ठिकाणी मूर्तीरूपात विसावून देवी गुप्त झाली.देवीच्या आज्ञेप्रमाणेगावच्या पश्चिमेला महाकालेश्वर मंदिरात आदिशक्तीची प्राणप्रतिष्ठा केली.तो दिवस चैत्र वद्य अष्ट्मीचा होता. तेव्हापासून दरवर्षी चैत्र वद्य अष्टमीदिवशी यमाई देवीची यात्रा भरते. शारदीय नवरात्रौत्सवही मोठ्या उत्साहातसाजरा केला जातो. श्री यमाई देवीच्या स्थापनेनंतर रंगनाथ स्वामी यांनाआदिलशाहाने तनखा जाहीर केला. तेव्हापासून रंगनाथ स्वामी गोसावी यांचेआडनाव मोकाशी हे पडले.[१]

श्री तुळजाभवानीची मोठी बहीणअसलेल्याउत्तरसोलापूरतालुक्यातील श्रीक्षेत्र माडीं येथील श्रीयमाई देवीच्या स्थापनेला८१० वर्षेपूर्ण झाली आहेत.साक्षात आदिशक्तीच्या वास्तव्यामुळे मार्डी गावाला शक्तिपीठाचा वारसा लाभलेला आहे. 'श्री देवी सप्तशती' ग्रंथाचेरचनाकार महान शिवभक्त श्री मार्कंडेयऋषी यांची तपोभूमी म्हणून तसेच प्रतिकाशी म्हणून वारसा लाभल्याचा उल्लेख ग्रंथामध्ये आढळतो.'देवी भागवत' ग्रंथामध्येही या गावाचा उल्लेख आढळतो. विवाहानंतरनवदाम्पत्य तुळजापूरनंतर श्रीक्षेत्र मार्डी येथे दर्शनासाठी येतात, हेदेखील यास्थानाचे महात्म्य आहे.[२]

## श्रीक्षेत्र मार्डीयमाई देवीनवरात्रोत्सव यात्रा

सव्वाआठशे वर्षांची परंपरा असलेल्या उत्तरसोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाईदेवीच्या नवरात्रोत्सवाची सुरुवात दरवर्षी घटस्थापनेला होते. नवरात्र उत्सवकाळात दररोज पहाटे चार वाजतामहापूजा, सकाळी नऊ वाजता नित्यपूजा, रात्री आठ वाजता शेजारतीअसे नित्य उपक्रम होतात. ललित पंचमी दिवशी देवीची विशेष पूजा केली जाते. ललित पंचमीपासूनघट उठेपर्यंत गावातील भाविक श्री यमाई देवीच्यामंदिरात वास्तव्यास जातात व त्या ठिकाणी देवीचीआराधना करतात. देवी भक्त श्री रंगनाथ स्वामी मोकाशी यांनीस्थापन केलेल्या श्री रेणुकादेवी मंदिरात नवचंडीहोम होतो. खंडे नवमी दिवशीच्या उत्तर रात्री म्हणजे उजाडत्या वारी यमाई देवीच्या मंदिरातील नवरात्रोथापन(नववी माळ घालून घट उठविले जातात) होते. नवरात्र उत्सव काळातभाविकांची देवीच्या दर्शनासाठी मोठीगर्दी असते. विजयादशमी दिवशी सायंकाळी सातवाजता श्री यमाई देवीच्या उत्सव मूर्तीची व पादुकांचीपालखी मिरवणूक काढली जाते. त्यानंतर यात्रा उत्सवाची सांगता होते.[३]

## नान्नज गावातील माहूरचीआईप्रति माहूरगडाची रेणुकादेवीयात्रा

नान्नज ता. उत्तर सोलापूरयेथील ग्रामदैवत माहुरच्याआईविषयी (रेणुकादेवी) सांगितले जाते की, सुमारे २०० वर्षांपूर्वी नवरात्र काळातनान्नज गावामधून बैलगाड्या नांदेड जिल्ह्यातीलमाहूर गडावर रेणुकादेवीला जात असत.येताना याच सर्व बैलगाड्या नान्नजपासूनजवळच असलेल्या सध्याच्या देवीच्यामंदिराजवळ विसाव्याकरिता थांबत होत्या. यावेळी थांबलेल्या एकाबैलगाडीच्या बैलाच्या पायातील नखात अडकलेला खडा बाहेर पडला.

तेव्हातेथील उपस्थित असणाऱ्या भक्तास माहूरच्या आईने दर्शन दिले. तेव्हापासूनमाहूरच्या आईचे प्रतिठाणे म्हणून नान्नजची ओळख झाली, अशीआख्यायिका देवीचे मानकरी आजही मोठ्या श्रद्धेने सांगत असलेले दिसून येते.४

नान्नजमधील माहूरची आई मंदिराचे महाद्वार पूर्वेकडे असून देवी मंदिरावरीलवरचा भाग हा काळया पाषाणांनी बांधलेला आहे. समोर सभामंडपही आहे. जवळचकाही अंतरावर मराठवाड्याची सीमा असून तुळजापूर तालुक्यातील बोबडेवाडी, वडगाव, सावरगाव, गवळेवाडी, केमवाडी तर उत्तर सोलापूर तालुक्यतील नान्नज, मोहीतेवाडी, दारफळबी. बी., नरोटेवाडी, मार्डी, बाणेगाव, वडाळा तसेच सोलापूरातील भाविकांची नवरात्रकाळात व देवीच्या यात्रेत मोठी गर्दी पाहायला मिळते. या ग्रामदैवताची नवसाला पावणारी माहूरची आई अशी ओळख आहे.५

नवरात्र काळात 'माहूरची आई नवरात्र जागर' साजरा केला जातो.पायामध्ये पादत्राणे न घालता चालत पहाटेपासूनच लहान मुलांसह भाविकमंदिराकडे देवदर्शनाला जातात. पहाटेपासून मंदिर परिसरात चहा, दूध,केळी, फराळाच्या पदार्थांचे भाविक वाटप करतात. दसऱ्यादिवशी रात्रीनंदाईदेवी मंदिरापासून गावात देवीच्या पालखीची मिरवणूक निघते. कार्तिकमहिन्यातील त्रिपुरारी पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी ग्रामदैवत माहूरची आई देवीचीमोठी यात्रा मंदिर परिसरात भरते. कार्तिकी पौर्णिमेदिवशी व यात्रेदिवशी गावातूनदेवीची पालखी मिरवणूक काढली जाते. यात्रेच्या दिवशी देवीच्या दर्शनासाठीपरगावांहून आलेल्या लेकुरवाळया महिला, माहेरी आलेल्या मुली व सासरच्यासुना लहान मुला-मुलीसह देवीच्या दर्शनासाठी हजेरी लावतात. माहूरची आई देवीचे मानकरी नान्नज येथील तोडकर व कोरे कुटुंबे आहेत. दरम्यान, नबरात्र काळातपहाटे पाच वाजता, सकाळी अकरा वाजताव रात्री आठ वाजता देवीची आरती,देवीला अभिषेक असा धार्मिक विधी सुरू असतो. मंदिर परिसरात अनेक भाविकनवरात्र उत्सवात मुक्कामी राहतात.६

## नान्नजच्या लालूमाईची यात्रा

दर तीन वर्षांनी उत्तर सोलापूर तालुक्यातील नान्नज व दारफळबी.बी.येथील गोपाळ (डोंबारी) समाज बांधवांचीलालूमाई देवीची यात्रा गुढी पाडव्यापासूनभरते. यात्राकाळातगोपाळ समाजातील पंच कमिटीतील सरपंच, अध्यक्ष, तलाठी, पाटील व ज्येष्ठांच्या मध्यस्थीने वाद, तंटा, विवाह जमविणे तसेच विवाह पार पडतअसल्याचे दिसून येते.नान्नज येथे सुमारे तीनशे वर्षापूर्वीलालूमाई ही २२ वर्षाची तरुणीगावोगावी तारेवरील कसरत कला सादरकरत होती. त्यावेळी तिने कला सादरकरण्याकरीता नान्नज हे गाव पसंद केले.गावात दोन महिने कला सादर केली. तीभाकरी न खाता फळांचे सेवन करतहोती. तिसऱ्या महिन्यामध्ये तिनेगावातील सर्वांना सांगितले, मी याचगावामध्ये माझा प्राण सोडणार आहे.नंतर माझी समाधी बांधून, मंदिर उभेकरून गोपाळ (डोंबारी) समाजानेयाठिकाणी माझ्या नावाने यात्राभरवावी, असे गोपाळ (डोंबारी) समाजातीलवयोवृद्ध व्यक्ती आजही आख्यायिका आनंदाने सांगतात.तेव्हापासून आजपर्यंत दर तीन वर्षांनी नान्नज- दारफळबी.बी. रस्त्याशेजारीललालूमाई मंदिरपरिसरात गुढी पाडव्यापासूनयात्रा भरवली जाते.यात्रे अगोदर एकमहिना महाराष्ट्रासह सातारा, सोलापूर,कर्नाटक राज्यासह इतर ठिकाणांवरील (डोंबारी) गोपाळ समाजउपस्थिती लावत असल्याचे दिसून येते.७

## वडाळा येथील शेख फरीद बाबा उरूस यात्रा

उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा गावी सुफी संप्रदायातील शेख फरीद बाबा यांचा दर्गा आहे. त्यांच्या कालखंडाविषयी निश्चित माहिती मिळत नाही. हे बाबा नवसाला पावतात अशी हिंदू व मुस्लीम दोन्ही धर्मातील भाविक भक्तांची श्रद्धा आहे. त्यामुळे दोन्ही धर्मातील लोक बाबाला नवस बोलतात व नवस पूर्ण करतात. गुरुवार हा बाबांचा वार समजला जातो. दर गुरुवारी लोक दर्शनासाठी जातात. दर्ग्याचे मुलाणा म्हणून वडाळा गावातील मुस्लीम धर्मीय असणारे खतीब कुटुंब काम पाहत आहे. बाबांचा ऊरूस दरवर्षी वैशाख महिन्यातील चतुर्थीला साजरा केला जातो. यावेळी वडाळा गावामध्ये मोठी यात्रा असते. सोलापूर व उस्मानाबाद, जिल्ह्यातील ५००० ते

१०,००० भाविक या दिवशी बाबांच्या दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी येतात. हि यात्रा तीन दिवस असते. पहिल्यादिवशी रात्रीच्यावेळी संदल मिरवणूक काढली जाते. मिरवणूकीवेळी गावातील प्रत्येक कुटुंब बाबांच्या दर्ग्यासाठी म्हणून मुलाण्याजवळ तेल दान करतात. संपूर्ण गावातून फिरून मिरवणूक दर्ग्याजवळ जाऊन विसर्जित होते.८दुसऱ्या दिवशी मुख्य यात्रा असते. या दिवशी गावातून तीन मानाच्या काठ्यांची मिरवणूक काढली जाते. मराठा, मातंग, चांभार या तीन समाजातील लोकांना तीन काठ्या बनविण्याचा व सजविण्याचा मान दिलेला आहे. बहुतेक या तीन समाजातील लोकांच्या पूर्वजांनी या बाबत बाबाला नवस केला असावा. तो फेडण्याचे काम त्यांचे वंशज करत आहेत. काठ्यांची मिरवणूक दर्ग्याजवळ दर्शन घेऊन विसर्जित केली जाते. या दिवशी रात्री गावात लोककलेचा (तमाशाचा)कार्यक्रम असतो. तिसऱ्या दिवशी कुस्त्यांची स्पर्धा असते. स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी महाराष्ट्रातून पैलवान येतात.९अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते व त्यातून हिंदू मुस्लीम ऐक्य साधले जाते.

अशा प्रकारची धार्मिक स्थळे उत्तर सोलापूर तालुक्यामधील मार्डी, नान्नज, वडाळा इत्यादी गावामध्ये असून त्या धार्मिक स्थळांच्या यात्रा अत्यंत उत्साहाने साजऱ्या केल्या जात आहेत.

## निष्कर्ष

उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी, नान्नज, वडाळा गावामध्ये असणारी देवतांची मंदिरे प्राचीन व मध्ययुगीन काळातील असून ती विविध जाती धर्माची आहेत. येथील विविध जाती धर्माच्या देवतांच्या यात्रांच्या माध्यमातून धार्मिक व सामाजिक सलोखा राखला जात असल्याचे दिसून येते. विविध जाती धर्माच्या देवतांच्या यात्रा अत्यंत उत्साहात भरविल्या जातात. यात्रा व उत्सवामुळे तालुक्यातील ग्रामीण समाजजीवन समृद्ध झाल्याचे दिसून येते. अशा यात्रांमुळे ग्रामीण कलाकारांना व लोककलावंताना आपली कला सादर करण्याची संधी मिळते.त्यामुळे त्यांच्या कलेचे जतन व संवर्धन होण्यास मदत होत आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१. दैनिक पुढारी, सोलापूर, दि. २२/ १०/ २०२३.
२. कित्ता, दि. २२/ १०/ २०२३.
३. दैनिक सुराज्य सोलापूर, दि. १५/ १०/ २०२३, पृष्ठ क्र. २.
४. मुलाखत, कोरे सतीश, नान्नज, उत्तर सोलापूर, दि. १५/ ०५/ २०२३.
५. दैनिक पुढारी, सोलापूर, दि. १७/ १०/ २०२३.
६. कित्ता, दि.१७ /१०/ २०२३.
७. दैनिक पुढारी सोलापूर, दि. २६/ ०३/ २०२३, पृष्ठ . ७.
८. मुलाखत,खतीब बशीर रशीद, वडाळा ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर, दि. २२/ ०५/ २०२३.
९. दैनिक लोकमत, सोलापूर, दि.२५/ ०५/ २०२३.